स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत

समाजकार्य विद्याशाखेतील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा

संशोधन विषय

बांधकाम कामगार कल्याण योजनेतुन कामगारांच्या सक्षमीकरणाचा चिकित्सक अभ्यास

(विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

संशोधक

व्यंकटेश अशोक हंगरगे

(एम. एस. डब्ल्यु.)

मार्गदर्शक

डॉ. दिनेश शिवाजी मौने

सहयोगी प्राध्यापक तथा विभागप्रमुख

समाजकार्य विभाग

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

❖ प्रस्तावना :

इतरांची घरे तयार करण्यासाठी उभे आयुष्य खर्च करणारे कामगार जरी असले तरी हक्काचे स्वतःच घर त्यांना मिळत नाही अशा बांधकाम करणाऱ्या मजुरांचे-कामगारांचे प्रश्न अतिश गंभीर आहेत. सकाळी आठ वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत कामाच्या कचाट्यात सापडलेला हा मजूर लातूरच्या चारही बाजूंना दिसतो. शहर विकास पावताना भौतिक सोयी-सुविधांची निर्मिती व पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी बांधकाम क्षेत्रातील कुशल, अर्धकुशल व अकुशल अशा तीनही स्तरांतील मजुरांची आवश्यकता असते. त्यामध्ये स्त्रिया-पुरुष अशा दोन्हींचा समावेश आहे. ग्रामीण भागातील अल्प भूधारक, भुमिहीन, स्थलांतरीत शेतमजूर यांचा शहराकडे काम शोधण्यासाठी प्रचंड मोठा ओढा दिसून येतो. जेमतेम दहावीपर्यंत, बारावीपर्यंत क्वचित वेळेस पदवी झालेली मुलंसुद्धा मजूर म्हणून या क्षेत्रात काम करताना आढळतात. तर कधी कुटुंबात कोणाचे शिक्षण झालेलं नसतं, घरात असणारे अठराविश्व दारिद्र्य, आरोग्याचे प्रश्न या पेचातून सुटण्यासाठी लातूरला येण्याचा मार्ग स्वीकारलेला असतो. हे मजूर बांधकाम, दगड काढणारा, दगड फोडणारा, रस्त्याचे कामे अशा प्रचंड अंगमेहनतीच्या कामात नाइलाजाने येतात. असंघटित असल्यामुळे त्यांच्या कामाचा मोबदला त्यांना योग्य पद्धतीने मिळत नाही. शिवाय कामाचे ठिकाण सतत बदलत असते. कामगारांना दररोज कामाची शोधाशोध करावी लागते. काही ठिकाणी काम मोठं असेल तर आठ-दहा दिवस सलम काम लागते आणि जर त्यात काही अडचणी आल्या तर दुसऱ्या दिवशी इतर ठिकाणी जावे लागते. या कामाच्या स्वरुपामुळे संघटना बांधणी योग्यप्रकारे होत नाही. शिक्षणाचा अभाव, शिवाय घराबाहेर कधी न पडलेल्या स्त्रिया कुटुंबाच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे त्यांच्या पतीसोबत पहिल्यांदा या क्षेत्रात आल्या असतील तर त्यांचे खूप हाल होतात. त्यामध्ये ही कुटुंबातील लहान मुलांच्या वाट्याला जास्त हाल येतात. अशा स्त्रियांना कामाचा शोध घेताना सुद्धा मोठ्या अडचणी येतात नेमकं कुणाला बोलावे, कोणाशी भेटावं, काम कसं करायचं याचं प्रशिक्षण नसतं. त्याचा गैरफायदा गुत्तेदार, अनुभवी मिस्त्री घेत असतात. काम मिळालं नाही तर अख्खा दिवसचा दिवस वाया जातो. काम मिळावं यासाठी गुत्तेदाराची आचकट-विचकट भाषा झेलावी लागते. त्यांना मिस्त्रीच्या हाताखाली दिवसभर मालाच्या टोपल्या द्याव्या लागतात, माल तयार करुन देणे असे त्यांच्या कामाचे स्वरुप राहते. जर त्यांनी हळूहळू काम केलं; कामाला उशीर झाला तर काम संपेपर्यंत थांबावं लागतं. कधी कधी कामावर मिस्त्री सांगेल तेवढा वेळ थांबावं लागते. पाच ते दहा टक्के बांधकाम कामगारांना हात मोजे असतात. कडक अंगावरती वाफा मारणाऱ्या केमिकल्स असलेली

सनला हाताने कालवावा लागतो. सुरक्षिततेसाठी डोक्याला सेफ्टी गार्ड नसतो. लोखंडी सळई लागली, अपघात झाला तर विमाही नाही, तसेच शारीरिक इजा झाली तर गुत्तेदार व मालक त्या कामगारांना साधे दवाखान्याचा खर्च देण्यास तयार नसतात. पुरुषांना मनगट, खांदे, कंबर, गुडघेदुखी, त्वचा रोग, दम लागणे असे त्रास होतात तर महिलांना कंबर, गुडघेदुखी, केस जाऊन टक्कल पडणे, मासिक पाळीत अंगावरचे जाणे, गर्भपात होणे अशा प्रश्नांना हमखास सामोरे जावे लागते. कोणत्याही बांधकामावर सेफ्टी एड बॉक्स दिसणार नाही. काही ठिकाणी तर प्यायला पाणीसुद्धा मालक आणि गुत्तेदार लवकर उपलब्ध करीत नाहीत. या कामगारांची बहुतेकदा नोंदणी झालेली नसते, अनेकदा कागदपत्रांची पुर्तता झाली नसल्यामुळे रेशनकार्ड मिळत नाही. मुलांच्या देखभालीचे प्रश्न अत्यंत गंभीर स्वरुपाचे असतात, सोबत आणलं तरी त्याला सांभाळणाऱ्या दुसऱ्या मुला-मुलींची शाळा हमखास बुडते. कोणतेही आर्थिक पाठबळ नसल्याने मुलांचे शिक्षण अर्धवट राहते तसेच स्त्री व पुरुष बांधकाम मजुरांच्या मजुरीतही तफावत दिसुन येते. स्त्रियांना ३०० ते ३५० तर कुशल पुरुष कामगारांना ८०० ते ९००, अर्धकुशल कामगारांना ४०० ते ५०० रुपये तर अकुशल ३०० ते ४०० रुपयेपर्यंत मजुरी असते. एवढ अंगमेहनतीचे काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांचा आहार सकाळी निलंगा राईस व वडापाव, पुरी-भाजी व भजे अशा स्वरुपाचा असतो. अशा असंख्य प्रश्नांनी बांधकाम कामगारांचे आयुष्य व्यापले आहे. राज्यातील जवळपास २५ लाख बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षितता व कल्याणकारी सुविधा पुरविण्यासाठी 'बांधकाम कामगार कल्याण' मंडळ स्थापन झाले. मात्र या मंडळात बांधकाम कामगारांची नोंदणीच फारशी झालेली नाही. नोंदणी करण्यासाठी बांधकाम कामगारांना ९० दिवसाचा काम करण्याचा दाखला मालकांनी (गावपातळीवर - ग्रामसेवक, नगरपालिका - मुख्याधिकारी, महानगरपालिका - प्राधिकरण अधिकारी) द्यावयाचा अधिकार दिल्यामुळे पुरेशी नोंदणी होत नाही. लातूर जिल्ह्यात एकूण असंघटित कामगारांची लोकसंख्या सरासरी ९ ते १० लाख आहे. त्यात बांधकाम मजूरांची नोंदणी संख्या ४० ते ४५ हजारांच्या आत आहे. ज्यात १० ते १५% स्त्रिया आहेत. लातूर जिल्ह्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणासाठी मंडळ २०११ पासुन कार्यान्वीत आहे. त्यांच्यामार्फत वेगवेगळ्या योजनांचा लाभ नोंदीकृत बांधकाम कामगारांना मिळाल्या आहेत. मात्र लातूरमध्येही नोंदणीच प्रमाण अल्प आहे. ज्यांची विविध कारणे आहेत मात्र कामगार म्हणुन नोंदणीसाठी आवश्यक प्रमाणपत्र व ते देण्यासाठी निर्माण केलेली नोकरशाही हा मोठा अडथळा आहे. तसेच या मंडळाकडे असलेला निधी फारसा खर्चही होत नाही. इमारत व बांधकाम कामगार अधिनियम, १९९६ करुनही त्याची सशक्तपणे

अंमलबजावणी करणारी पुरेशी यंत्रणा उपलब्ध नसते त्यामुळे त्याचा लाभ बांधकाम कामगारांना पुरेसा होत नाही. यामुळे बरेचसे कामगारांचे कुटुंब योजनेपासुन वंचित आहेत.

❖ संशोधन पद्धती :

❖ संशोधन विषयाची निवड :

आजही बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबाचे खुप मोठ्या प्रमाणात प्रश्न सुटलेले नसल्यामुळे त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यासाठी शासनाने बांधकाम कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता व कल्याणकारी सुविधा पुरविण्यासाठी 'बांधकाम कामगार कल्याण मंडळ' स्थापन केलेले आहे. तरी पण लातूर जिल्ह्यातील बांधकाम कामगार हे नोंदणीकृत नसल्याने खुप मोठ्या प्रमाणात योजनेतुन मिळणाऱ्या सुविधांचा लाभ घेत नसल्याचे दिसुन येते. या योजनेतुन कामगारांचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले. म्हणुन बांधकाम कामगार कल्याण योजनेतुन कामगारांचा सक्षमीकरणाचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

❖ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत संशोधनात विषयाच्या अनुषंगाने पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) लातूर जिल्ह्यातील बांधकाम कामगार लाभार्थ्यांची सांख्यिकीय आकडेवारी जाणून घेणे.

२) लातूर जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजना जाणुन घेणे.

३) लातूर जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या आरोग्यविषयक योजना व स्थितीचा अभ्यास करणे.

४) लातूर जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

५) लातूर जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या मुलांना मिळणाऱ्या शैक्षणिक योजनांचा अभ्यास करणे.

६) लातूर जिल्हातील बांधकाम कामगारांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांच्या कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करणे.

❖ संशोधनाची गृहितकृत्ये :

१) बांधकाम कामगार असंघटित असल्याने त्यांच्या आर्थिक व सामाजिक सुरक्षेचा प्रश्न दिसुन येतो.

२) बांधकाम कामगार असंघटित असल्याने त्यांच्या सक्षमीकरणांचा प्रश्न निर्माण होतात.

३) बांधकाम कामगार हे अर्धकुशल व अकुशल अशा गटात मोडत असल्याने काम करीत असताना आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात.

४) बांधकाम कामगार रोजच्या मिळणाऱ्या मोबदल्यावर अवलंबून असल्यामुळे आर्थिक प्रश्न व कौटुंबिक प्रश्न निर्माण होतात.

५) बांधकाम कामगारांना मिळणाऱ्या अपुऱ्या मोबदल्यामुळे गरिबी व दारिद्र्य यांस तोंड द्यावे लागते.

❖ संशोधन विषयाचे क्षेत्र :

बांधकाम कामगार कल्याण योजनेतुन कामगारांच्या सक्षमीकरणाचा चिकित्सिक अभ्यास करण्यासाठी संशोधकाने लातूर जिल्ह्याची निवड केली असुन लातूर जिल्हयातील लातूर, उदगीर, अहमदपूर, औसा, निलंगा, रेणापूर, चाकुर, देवणी, शिरूर अनंतपाळ आणि जळकोट या दहा तालुक्यातील बांधकाम कामगार संशोधन अध्ययनासाठी निवडलेले आहे.

❖ संशोधन आराखडा :

संशोधनाचे उद्दिष्ट्य प्राप्त करण्यासाठी व संशोधनाला सुयोग्य दिशा देण्यासाठी संशोधन आराखडा केला जातो. संशोधन विषयाचा पुर्व अंदाज घेवुन आराखड्याचे स्वरुप निश्चित करावे लागते. त्यामुळे, संशोधनात आराखड्याला विशेष महत्त्व आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय बांधकाम कामगार कल्याण योजनेतुन कामगारांच्या सक्षमीकरणाचा चिकित्सिक अभ्यास - विशेष संदर्भ : लातूर जिल्हा हा असल्याने प्रस्तुत अध्ययनात विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन आराखडा या पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्याआधारे संशोधनाची दिशा ठरवुन तथ्य संकलनासाठी अध्ययन केले जावून त्याआधारे मिळवलेल्या माहितीचे वर्गीकरण करुन निष्कर्ष काढले जातील.

❖ नमुना निवड :

संशोधन नमुना जर प्रतिनिधीक व योग्य असेल तर निष्कर्ष देखील सुयोग्य राहतात. म्हणुन संशोधनाची सार्थकतेकरिता प्रतिनिधीक नमुन्याची आवश्यकता असते. म्हणुन संशोधन विषयामध्ये गैरसंभाव्यता नमुना निवडीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करुन तथ्य संकलन केले जाईल. त्यासाठी संशोधन क्षेत्रातील लातूर - ३०, उदगीर, ३०, अहमदपूर - ३०, औसा - ३०, निलंगा - ३०, रेणापूर - ३०, चाकुर - ३०, देवणी - ३०, शिरूर अनंतपाळ - ३० आणि जळकोट - ३० या दहा तालुक्यातील एकुण ३०० एककाची सदरील संशोधकाची नमुना निवड करण्यात येईल.

❖ तथ्य संकलन पद्धती :

सामाजिक संशोधनात तथ्य व स्त्रोत महत्त्वाचे असतात. तथ्य व साधनांच्या आधारावरच निष्कर्ष मानले जातात. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी दोन प्रकारच्या तथ्य संकलन स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्राथमिक स्त्रोत व व्दितीयक स्त्रोत यांचा समावेश होतो.

➢ प्राथमिक स्त्रोत :

यामध्ये प्राथमिक स्त्रोत प्रत्यक्ष सहभागी निरीक्षणे व मुलाखत अनुसुची या स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे. संशोधनाचे उद्देश व गृहितकृत्ये समोर ठेवुन मुलाखत-अनुसुची बनवली जाईल व त्यानूसार वस्तूनिष्ठ माहिती मिळविण्यासाठी उपयोगात आणले जाईल.

➢ व्दितीयक स्त्रोत :

या विषयाशी संबंधित संशोधनपर लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके, पुस्तके, साप्ताहिके, दैनिके, विशेषांक, शासन अहवाल, शासन निर्णय पत्रक, शोध पत्रिका व माहिती पुस्तिका यासंबंधित विविध संकेतस्थळे इत्यादींचा आधार घेतला जाईल.

❖ तथ्यांचे वर्गीकरण :

संशोधनासाठी संशोधक जी तथ्य संकलित करतो ती अस्पष्ट, विस्तृत व आस्ताव्यस्त स्वरुपात असतात. अशा विस्तृत व विखुरलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण करणे कठीण कार्य असते. तथ्यांचे निर्वचन सुलभतेने होण्यासाठी समजण्यायोग्य सारख्या आधारावर तथ्यांचे गट पाडणे म्हणजे वर्गीकरण किंवा श्रेणीकरण होय. तथ्यांचे विश्लेषण करणे सुलभ व्हावे यासाठी तथ्यांमधील समान किंवा असमान बाबीं कोणत्या आहेत. हे निश्चित करावे लागते म्हणजेच तथ्यांचे निश्चित प्रकार किंवा वर्ग पाडण्यासाठी काही आधार निवडावे लागतात. त्यामुळे विखुरलेले तथ्य एका निश्चित स्वरुपाच्या प्रकारात किंवा वर्गात स्पष्ट होवु लागतात. तेंव्हा प्रस्तुन संशोधनात तथ्यांचे वर्गीकरणाचा योग्य प्रकारे उपयोग केला जाईल.

❖ तथ्यांचे विश्लेषण व निर्वाचन :

तथ्यांचे विश्लेषण व निर्वाचन केल्याशिवाय अध्ययनातून निष्कर्ष काढून शक्य होणार नाही. विश्लेषणांची परिनिती जर सामान्य स्वरुपाच्या निष्कर्षाच्या मांडणीत होत असेल तर संशोधन कर्त्यांस हे जाणून घ्यावयाचे असते की त्यांनी काढलेल्या निष्कर्षाचा वास्तविक अर्थ काय होतो अथवा या निष्कर्षामधून काय प्रतिबिंबीत होते, निर्वाचन हेच जाणून घेण्याचा एक मार्ग असल्याने खऱ्या अर्थाने

निर्वाचन खेरीज विश्लेषणाच्या कार्याची सांगता होत नाही. यामध्ये केंद्रीय प्रवृत्तीची मापके, सरासरी, टक्केवारी, सहसंबंध, तक्ता, मास्टरचार्ट या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. विश्लेषणाबरोबरच निर्वाचनाचाही अवलंब करण्यात येईल.

❖ निष्कर्ष व निष्कर्षाचे निर्वाचन :

संशोधनातील निष्कर्ष व निर्वाचन ही शेवटी येणारी पायरी आहे. संशोधनाच्या माध्यमातुन जे काही तथ्य प्राप्त होतात, त्याचे विश्लेषण व निर्वाचन झाल्यानंतर त्याचे संक्षिप्त स्वरुपात जे तथ्य बाहेर येतात त्यात निष्कर्ष असे म्हणतात, प्राप्त झालेल्या निष्कर्षाचे विवेचन किंवा प्रसुतीकरण करण्याचे काम संशोधकाला करावयाचे आहे. तेव्हा निष्कर्षाचे निर्वाचन झाल्यानंतर संशोधक गृहितकृत्याची पडताळणी करुन कोणते गृहितकृत्य सत्य व असत्य ठरले आहेत याची शाहानिशा करण्यासाठी संशोधनात गृहितकृत्याचा पडताळा करण्यात येणार आहे.

❖ संशोधन मर्यादा :

प्रस्तूत संशोधनासाठी बांधकाम कामगार कल्याण योजनेतुन कामगारांचा सक्षमीकरणाचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे. त्यासाठी लातूर जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडलेले आहे. जिल्ह्यातील १० तालुक्यातील बांधकाम कामगार उपलब्धतेनुसार व नमुना म्हणुन निवडलेल्या उत्तरदात्याने दिलेल्या माहितीच्या सत्यतेवर या संशोधनातील विश्लेषणावर अवलंबुन राहील.

❖ संशोधन कालावधी :

सदरील संशोधनाचा कालावधी हा इ. स. २०२३ ते २०२७ या कालावधीमध्ये संशोधन अध्ययन करण्यात येणार आहे.

❖ प्रकरणाची रुपरेषा :

प्रकरण पहिले	:	प्रस्तावना
प्रकरण दुसरे	:	साहित्याचा आढावा
प्रकरण तिसरे	:	संशोधन पद्धती
प्रकरण चौथे	:	तथ्य विश्लेषण व निर्वाचन
प्रकरण पाचवे	:	समस्या व अडचणी
प्रकरण सहावे	:	निष्कर्ष, सारांश आणि शिफारशी
		परिशिष्ट्ये - मुलाखत-अनुसुची, संदर्भ ग्रंथसुची

❖ **संदर्भग्रंथ सुची :**

१) रा. ना. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन पद्धती व तत्वे, मंगेश प्रकाशन, नागपुर प्रथम आवृत्ती, २००९-१०.

२) डॉ. डी. सी. सावंत, संशोधन पद्धती, ईगल लीप प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०२१.

३) डॉ. संतोष खिराडे, संशोधन पद्धती व संशोधन प्रकाशनाची नीतितत्वे, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, आवृत्ती, २०२१.

४) प्रा. अनिल जायभाये, परिघावरील आवाज, हरिती पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, २०२१.

५) संकेतस्थळ,https://krushidavani.in/bandhkam-kamgar-yojana-fayde/